INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCES AND INFORMATION STUDIES
© VISHWASHANTI MULTIPURPOSE SOCIETY (Global Peace Multipurpose Society) R. No.MH-659/13(N)
www.vmsindia.org

# भारतीय क्रिकेट, बॉलिवूड, उद्योग जगत आणि राजकारण : अविभाज्य संबंध

**बावगे रा.**
सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख (राज्यशास्त्र)
वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपूर

**प्रस्तावना :**

राजकारण व राजकीय प्रक्रिया ही एक व्यापक गुंतागुंतीचा विषय आहे. राजकारण आणि समाजकारण, राजकारण आणि अर्थकारण यात याचा परस्परावलंबी निकटचा संबंध असतो. व्यक्ती किंवा एखादी संस्था राजकीयदृष्टया सक्रिय अथवा निष्क्रिय राजकारणाचा अपरिहार्य परिणाम व्यक्तीवरही होतोच. त्यामुळे राजकारणापासून तसा कोणी अलिप्त राहू शकत नाही. म्हणूनच खेळ, खेळ संघटना, खेळाडू व राजकारण यांचा परस्परांशी संबंध येतो. भारतीय खेळ जगतही त्याला अपवाद नाही. भारतीयांना क्रिकेटने वेड लावलेले आहे. भारतात क्रिकेटला धर्माचे स्थान आहे. भारतीय क्रिकेटपटूंना देव म्हणून प्रेक्षकांकडून पाहिले जाते. जनमानसावरती क्रिकेट व क्रिकेट पटुंचा जबरदस्त प्रभाव आहे. याशिवाय क्रिकेट हा खेळ भारतातील प्रतिष्ठा व खूप पैसा मिळवून देणारा व्यवसाय बनला आहे. त्यामुळेच राजकारणी क्रिकेट संघटनांच्या राजकारणात हिरिरीने भाग घेतात. जसे राजकारण्यांचे हितसंबंध क्रिकेट या खेळात आहेत तसेच क्रिकेटपटू व राजकारण यांचाही निकटचा संबंध राहात आलेला आहे. क्रिकेटपटू आपल्या वलयाचा वापर राजकारणात करताना दिसतात म्हणूनच भारतीय क्रिकेट व राजकारण यांचे नाते 'चोली दामन का रिश्ता' बनले आहे असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरू नये. प्रस्तुत लेखात भारतीय क्रिकेट व राजकारण आणि सिनेमातील ग्लॅमर यांच्यातील संबंधांवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

भारतीय क्रिकेट, बॉलिवूड, औद्योगिक घराणे व राजकारण यांच्यात मधूर संबंध राहात आलेले आहेत. त्यांच्यातील संबंधांचे स्वरूप पुढील गृहितकांच्या आधारे समजावून घेता येईल –

**गृहितके** –

१. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ व मुंबई क्रिकेट संघटनेवर राजकारण्यांनी पूर्णपणे नियंत्रण मिळविले आहे. त्यामुळे क्रिकेटचे राजकीयीकरण होत आहे.

२. क्रिकेटपटू हे भारतीय राजकारणात सक्रिय असून प्रभावी ठरतात.

३. क्रिकेट आता केवळ खेळ राहिलेला नाही तर त्याचे औद्योगिकरण व बाजारीकरण झाले आहे.

४. आय.पी.एल. हा क्रिकेटवर आधारित व्यवसाय किंवा धंदा बनला आहे.

५. ह्या व्यवसायात आर्थिक नफेखोरीसाठी विविध विचारप्रणाली असणारे, विविध क्षेत्रात काम करणारे, विविध राज्यातील राजकारणी, सिनेमावाले व उद्योगपतींमध्ये साटेलोटे आहे.

६. क्रिकेट या खेळाच्या मोहात सतत सिनेमाच्या ग्लॅमरमध्ये वावरणाऱ्या सिनेतारका अडकतात.

क्रिकेट व भारतीय राजकारण याचा दुहेरी संबंध आहे.

**राजकारणी व क्रिकेट संबंध** –

क्रिकेट या खेळाची असणारी लोकप्रियता, यात असलेला प्रचंड पैसा, व प्रसिद्धी याने राजकारण्यांना भूरळ पडली. म्हणूनच याचा राजकीय व आर्थिक लाभ घेण्यासाठी विविध घटक राज्याचे तसेच राष्ट्रीय स्तरावरचे नेते व राजकारणी यांनी क्रिकेट मंडळाच्या निवडणुका लढवून त्या संघटना ताब्यात घेतल्या. १९७०–८० च्या दशकापासूनच राजकारण्यांनी क्रिकेट संघटनांच्या राजकारणात रस दाखवायला सुरूवात केली. अमीत शहा, फारूख अब्दुल्ला, शरद पवार, विलासराव देशमुख, मनोहर जोशींसारख्या धुरंधर राजकारणी लोकांनाही क्रिकेट संघटनांचा मोह आवरता आला नाही. नंतरच्या कालखंडात क्रिकेट बोर्ड व इतर क्रिकेट संघटनांच्या निवडणुका राजकारणी साम, दाम, दंड, भेदाचा वापर करून लढवू लागले. पुढील तक्त्यावरून राजकारणी व क्रिकेट यांचे नाते स्पष्ट होईल. तसेच क्रिकेट संघटनांवरील नियंत्रण म्हणजे काही अधिकाराची दिखावू पदे नव्हेत हेही स्पष्ट होईल.

तक्ता क्र. १ भारतीय क्रिकेट नियंत्रक मंडळाच्या अध्यक्षांची यादी दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | राजकारणी व्यक्तीचे नाव | कालावधी पासून–पर्यंत | पक्ष | राजकारणातील पद | प्रदेश/मतदार संघ |
|---|---|---|---|---|---|
| १ | शेषराव वानखेडे | १९७२–१९७३<br>१९७९–१९८० (उपाध्यक्ष)<br>१९८०–१९८१ | कॉंग्रेस | विधानसभा अध्यक्ष | महाराष्ट्र |
| २ | नरेन्द्रकुमार साळवे | १९८२–१९८५ | कॉंग्रेस | केंद्रीय मंत्री | छिंदवाडा –मध्यप्रदेश व महाराष्ट्र |
| ३ | माधवराव सिंधिया | १९९०–१९९३ | कॉंग्रेस | केंद्रिय मंत्री, | ग्वाल्हेर–मध्यप्रदेश |
| ४ | शरद पवार | २००५–२००८ | राष्ट्रवादी कॉंग्रेस | मुख्यमंत्री व केंद्रिय मंत्री | बारामती महाराष्ट्र |
| | आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष | २०१०–२०१२ | | | |
| ५ | अनुराग ठाकूर | २०१६–२०१७ | भाजप | ३ वेळा लोकसभा सदस्य | हमिरपूर, हिमाचल प्रदेश |

उपरोक्त तक्ता क्र. १ वरून भारतीय क्रिकेट नियंत्रक मंडळावर प्रामुख्याने कॉंग्रेस व भाजप नेत्यांचे वर्चस्व असलेले दिसते. प्रादेशिक राजकीय पक्षांकडे क्रिकेट मंडळावर फारसे नियंत्रण नाही हे ही उपरोक्त तक्त्यावरून स्पष्ट होते.

तक्ता क्र. २ मुंबई क्रिकेट संघटना – अध्यक्षांची यादी दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | राजकारणी व्यक्तीचे नाव | कालावधी पासून–पर्यंत | पक्ष | राजकारणातील पद |
|---|---|---|---|---|
| १ | शेषराव वानखेडे | १९६३–१९६४ | कॉंग्रेस | विधानसभा सदस्य व अध्यक्ष |
| २ | मनोहर जोशी | १९९२–२००१ | शिवसेना | मुख्यमंत्री व लोकसभा अध्यक्ष |
| ३ | शरद पवार | २००१–२०११<br>२०१३–२०१७ | राष्ट्रवादी कॉंग्रेस | केंद्रिय मंत्री व पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष |
| ५ | विलासराव देशमुख | २०११–२०१२ | कॉंग्रेस | मुख्यमंत्री व केंद्रिय मंत्री |

तक्ता क्र.२ वरून स्पष्ट होते की, मुंबई क्रिकेट संघटनेवरती कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि शिवसेना या पक्षांचे नियंत्रण राहात आलेले आहे. भाजपा या स्पर्धेत दिसत नाही.

**तक्ता क्र. २**

तक्ता क्र. – ३ मुंबई क्रिकेट संघटना – उपाध्यक्षांची यादी दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | राजकारणी व्यक्तीचे नाव | कालावधी पासून–पर्यंत | पक्ष | राजकारणातील पद |
|---|---|---|---|---|
| १ | मनोहर जोशी | १९८५–१९९० | शिवसेना | मुख्यमंत्री व लोकसभा अध्यक्ष |
| २ | विलासराव देशमुख | २००९–२०११ | कॉंग्रेस | मुख्यमंत्री व केंद्रिय मंत्री |
| ३ | आशिष शेलार | २०१५–२०१७ | भाजप | आमदार व भाजप मुंबई अध्यक्ष |

तक्ता क्र. ३ वरून दिसते की, महाराष्ट्रातील कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, शिवसेना या राजकीय पक्षांना उपाध्यक्षपदी स्थान मिळाले आहे. २०१४ नंतर महाराष्ट्रातील राजकारणात स्थित्यंतर झाल्याने आशीष शेलारांच्या रूपाने मुंबई क्रिकेट संघटनेच्या राजकारणात भाजपाचा चंचूप्रवेश झाला आहे.

**क्रिकेटपटू व राजकारण संबंध** :–

राजकारण्यांनी क्रिकेट संघटनांमध्ये हस्तक्षेप करून आपला प्रभाव निर्माण केला. क्रिकेटपटुंनी राजकारणात प्रवेश करून आपला प्रभाव वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. इंग्लंड, ऑस्ट्रेलियामध्ये तर जॉन मेजर, बॉब हॉक हे क्रिकेटपटु पंतप्रधान पदापर्यंत पोहोचले. आपल्या शेजारी असणाऱ्या पाकिस्तानमध्ये इम्रानखनाने व श्रीलंकेत अर्जुन रणतुंगा आणि सनद जयसूर्या यांनी तेथील राजकारणात

आपला चांगला ठसा उमटविला आहे. भारतातही क्रिकेटपटुंना राजकारणाचे आकर्षण स्वातंत्रपूर्वकाळापासून आहे. परंतु मागील तीन दशकांत भारतीय क्रिकेटपटु हे आमदार/खासदार/मंत्री व मुख्यमंत्रीही झालेले आहेत.

तक्ता क्र. – ४ क्रिकेटपटुंची राजकारणातील कामगिरी दर्शविणारा तक्ता

जसे राजकारणी लोकांना क्रिकेटचे आकर्षण आहे तसेच क्रिकेटपटुंनाही राजकारणाने भुरळ घातली आहे हे पुढील तक्त्यावरून स्पष्ट होईल –

| अ.क्र. | क्रिकेटपटुचे नाव | राजकीय पक्ष | राजकारणातील पद | लढविलेल्या निवडणुका | इतर, प्रदेश/ मतदारसंघ |
|---|---|---|---|---|---|
| १ | बाळू पळवणकर | हिदु महासभा व कॉंग्रेस | –– | १९३३ ला हिंदु महासभे कडून मनपा निवडणूक लढविली – पराभूत | १९३७ साली मुंबई विधानसभा निवडणूक आंबेडकरांविरूद्ध लढविली, केवळ २ हजार मतांनी पराभूत |
| २ | किर्ती आझाद | भाजप | ३ वेळा लोकसभा खासदार २००४, २००९, २०१४ | बिहारच्या माजी मुख्यमंत्र्यांचे पुत्र | दरभंगा, बिहार |
| ३ | चेतन चव्हाण | भाजप | २ वेळा लोकसभा खासदार, १९९१–१९९८ | २०१७च्या उत्तरप्रदेश विधानसभा उमेदवार | क्रिकेट प्रशासकीय कार्य अमरोही, उत्तरप्रदेश |
| ४ | नवज्योतसिंग सिद्धू | भाजप व कॉंग्रेस | लोकसभा व राज्यसभा सदस्य | २०१७ पंजाब विधानसभा उमेदवार | स्टार प्रचारक व टेलिव्हिजन कलाकार कॉंग्रेस व पंजाब |
| ५ | मोहंमद अझरूद्दीन | कॉंग्रेस | लोकसभा सदस्य | लोकसभा, २००९ | मुरादाबाद,उत्तरप्रदेश |
| ६ | सचिन तेंडुलकर | अपक्ष | राज्यसभा सदस्य, २०१२ | राष्ट्रपतीव्दारा नामनिर्देशित | महाराष्ट्र आणि भारतरत्न पुरस्कार |
| ७ | किरणकुमार रेड्डी | कॉंग्रेस | मुख्यमंत्री | विद्यापीठ संघ व रणजीपटू | आंध्रप्रदेश |
| ८ | तेजस्वी यादव | राष्ट्रीय जनता दल | उपमुख्यमंत्री | रणजीपटू, आय. पी.एल. खेळाडू | राघोपूर, बिहार लालू यादवांचे पुत्र |
| ९ | मोहम्मद कैफ | कॉंग्रेस | –– | फुलपूर मतदार संघातून लोकसभा निवडणूक लढविली | |
| १० | श्रीसंत | भाजपा | –– | केरळ विधानसभा निवडणूक २०१६ लढविली – पराभूत, सिनेमा व टीव्ही कलाकार | |
| ११ | मनोज प्रभाकर | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस (तिवारी) | | न्वी दिल्ली मतदारसंघातून लोकसभा निवडणूक १९९८ लढविली – पराभूत | |
| १२ | मोहिंदर अमरनाथ | भाजपा | –– | –– | |
| १३ | दिलीप वेंगसरकर | | | शिवसेना नेत्यांशी जवळीक | |
| १४ | नवाब पतौडी | | | भोपाळ लोकसभा निवडणूक, १९९१ लढविली, पराभूत | |
| १५ | विनोद कांबळी | लोकभारती पक्ष | | विक्रोळी मतदारसंघातून विधानसभा निवडणूक २००९ लढविली, पराभूत | |

तक्ता क्र. ४ वरून क्रिकेटपटूंची राजकारणातील रूची, वावर व प्रभाव यांचे स्वरूप कसे आहे हे स्पष्ट होते.

तक्ता क्र. — ५ आय.पी.एल. उद्योगपती मालक व प्रमुख खेळाडूंची यादी दर्शविणारा तक्ता

| अ.क्र. | संघाचे नाव | संघाचा मालक | मालकाचा व्यवसाय | कर्णधार | इतर |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुंबई इंडियन्स | *नीता व मुकेश अंबानी | रिलायन्स ग्रुप | सचिन तेंडुलकर | *पती—पत्नी |
| २ | चेन्नई सुपर किंग | एन. श्रीनिवासन* | इंडिया सिमेंट उद्योग प्रमुख | महेन्द्रसिंग डोनी | *गुरूनाथ मैयप्पन यांचे सासरे |
| ३ | कोलकत्ता नाईट रायडर्स | शहारूखखान, *जुही चावला व जय मेहता | अभिनेता, अभिनेत्री, उद्योगपती | गौतम गंभीर | *पती—पत्नी |
| ४ | किंग्ज ११ पंजाब | प्रिती झिंटा व नेस वाडिया | अभिनेत्री, वाडिया ग्रुप | यूवराजसिंग डेव्हिड मिलर, (ऑस्ट्रेलिया) | |
| ५ | डेक्कन चार्जर | *गायत्री रेड्डी *व्यंकटराम रेड्डी | डेक्कन क्रॉनिकल कार्पोरेशन | कुमार संघकारा (श्रीलंका) | *पिता—पुत्री |
| ६ | रॉयल चालेंजर, बेंगलूरू | विजय माल्या | किंगफिशर | विराट कोहली | माल्यांची लिकर किंग अशी ओळख |
| ७ | राजस्थान रॉयल्स | शिल्पा शेट्टी व राजकुंद्रा | अभिनेत्री, एनआरआय उद्योगपती | शेनवॉर्न (ऑस्ट्रेलिया) | एनआरआय लंडन |
| ८ | दिल्ली डेअर डेव्हिल्स | जी.एम.राव | जी.एम.आर. ग्रुप | विरेन्द्र सहवाग/जहिरखान | |
| ९ | कोची टस्कर्स | कोची क्रिकेट प्रा. लि. | लालू ग्रुप इंटरनॅशनल, दुबई | श्रीसंत/ महिला जयवर्धने (श्रीलंका) | |
| १० | पुणे वॉरियर्स | सुब्रतो रॉय | सहारा ग्रुप | सौरभ गांगुली/ युवराजसिंग | |
| ११ | गुंजरात लॉयन्स | केशव बन्सल | इंनटेक्स टेक्नॉलॉजी | सुरेश रैना | |
| १२ | सनरायझर्स | *कलानिथी मारन | सन टी.व्ही. नेटवर्क | डेव्हिड वॉरनर (ऑस्ट्रेलिया) | *द्रमुक अध्यक्ष, करूणानिधींचा नातू |

तक्ता क्र. — ६ क्रिकेट व सिनेमा जगत यांचा संबंध दर्शविणारा तक्ता

राजकारण व क्रिकेट याचे जसे निकटचे संबंध राहात आलेले आहेत तसे क्रिकेट जगताचे सिनेमाशी जिव्हाळयाचे संबंध राहात आले आहेत हे पुढील तक्त्यावरून स्पष्ट होईल.

| अ.क्र. | क्रिकेटपटुचे नाव | सिनेमा/टी.व्ही. जगताशी संबंध | इतर |
|---|---|---|---|
| १ | नवाब अली पतौडी | अभिनेत्री शर्मिला टागौरशी विवाह | |
| २ | सर गॅरी सोबर्स ( कर्णधार, वेस्ट इंडिज) | अभिनेत्री अंजू महेंद्रुला हिऱ्याची अंगठी भेट दिली पण विवाह होऊ शकला नाही | |
| ३ | मोहसिनखान, पाकिस्तान | अभिनेत्री रिना रॉयशी विवाह | चित्रपटात अभिनय केला |
| ४ | किंग व्हिवियन रिचर्ड, कर्णधार (वेस्ट इंडिज) | अभिनेत्री निना गुप्ता ला कन्यारत्न प्राप्त | टेलिव्हिजन क्रिकेट विश्लेषक |
| ५ | इम्रानखान, कर्णधार, पाकिस्तान | अभिनेत्री झिनत अमान हिच्याशी मैत्रीमुळे सतत चर्चेत | |
| ६ | मोहम्मद अझरूद्दीन | अभिनेत्री संगीता बिजलानीशी दुसरा विवाह | कॉग्रेस लोकसभा खासदार |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | हरभजनसिंग | अभिनेत्री गीता बसरा सोबत विवाह | टेलिव्हिजन क्रिकेट विश्लेषक |
| ८ | संदिप पाटील | 'कभी अजनबी थे' हा हिंदी चित्रपट अभिनेत्री पुनम धिल्लो ला सोबत घेऊन बनविला परंतु सिनेमाला यश आले नाही. 'एकच षटकार' या नियतकालिकाचे संपादक. | |
| ९ | रवी शास्त्री | अभिनेत्री अमृतासिंहशी मैत्रीमुळे चर्चेत | |
| १० | विराट कोहली | अभिनेत्री अनुष्का शर्माशी मैत्रीमुळे सतत चर्चेत | |
| ११ | युवराजसिंह | अभिनेत्री दिपिका पादुकोनशी मैत्रीमुळे चर्चेत | |

**निष्कर्ष :**

१. भारतीय क्रिकेट नियामक मंडळ व मुंबई क्रिकेट संघटनेवर राजकारण्यांनी पूर्णपणे नियंत्रण मिळविले आहे. त्यामुळे क्रिकेटचे राजकीयीकरण होत आहे. या गृहितकाची पुष्टी तक्ता क्र. १, २ व ३ करतात. या तक्त्यावरून राजकीय पक्ष व नेते यांचे क्रिकेट संघटनांवरती असलेले नियंत्रण स्पष्ट होते. त्यामुळे हे गृहितक बरोबर ठरले आहे.

२. क्रिकेटपटू हे भारतीय राजकारणात सक्रिय असून प्रभावी ठरतात. तक्ता क्र. ४ वरून क्रिकेटपटुंची राजकारणातील रूची, वावर व प्रभाव स्पष्ट होतो. या गृहितकाची पुष्टी तक्ता क्र. ३ वरून होते. त्यामुळे गृहितक क्र.२ सिद्ध होते.

३. क्रिकेट आता केवळ खेळ राहिलेला नाही तर त्याचे औद्योगिकरण व बाजारीकरण झाले आहे. मोठया प्रमाणावर खेळाडूंच्या लिलावात सहभागी उद्योगपती व उद्योग समूह सहभागी होतात. तसेच खेळाडू स्वत:चा लिलाव करून घेण्यात धन्यता मानतात. हे सर्व व्यवहार जाहिरपणे होतात त्यामुळे तिसरे गृहितक तक्ता क्र. ५ वरून सिद्ध होते.

४. भारतात १९९० नंतरच्या उदारीकरण धोरणाचा परिणाम क्रिकेटवरही होणे अपरिहार्य होते. अनेक उद्योगसमूह आयपीएल च्या माध्यमातून क्रिकेटच्या व्यवसायात गुंतवणूक करू लागले. त्यानंतर क्रिकेट जगताचे स्वरूप कार्पोरेटप्रमाणे झाले. जाहिरात, क्रिडा व्यवस्थापन कंपन्या, सट्टेबाजी, मॅच फिक्सींग यात स्पर्धा सुरू झाली. भ्रष्टाचार व काळया पैशाचा वापर यामुळे सभ्य लोकांचा खेळ अशी असलेली क्रिकेटची प्रतिमा काळवंडली. क्रिकेट (आय.पी.एल.) व्यवसाय किंवा धंदा बनल्याने व्यवसायात आर्थिक नफेखोरीसाठी विविध विचारप्रणाली असणारे, विविध क्षेत्रात काम करणारे, विविध राज्यातील राजकारणी, सिनेमावाले व उद्योगपतींमध्ये मध्ये असलेल्या साटेलोटयांचे स्वरूप तक्ता क्र.५ वरून लक्षात येते. आय.पी.एल. पदाधिकारी राजीव शुक्ला (काँगेस), ज्योतिरादित्य सिंदिया (काँग्रेस), अनुराग ठाकूर (भाजप) हे राजकारणी आय.पी.एल. चे पदाधिकारी राहात आलेले आहेत. शरद पवारांचा उल्लेख अनेक वेळा 'कृषी मंत्री की क्रिकेट मंत्री' असा केला जायचा. ह्यावरून गृहितक ४ व ५ सिद्ध होते.

५. क्रिकेट या खेळाच्या मोहात सतत सिनेमाच्या ग्लॅमरमध्ये वावरणाऱ्या सिनेतारका अडकतात. क्रिकेट व भारतीय राजकारण याचा दुहेरी संबंध आहे. हे शेवटचे गृहितक तक्ता क्र. ५ व ६ वरून सिद्ध होते. सिनेमा जगतातील स्टार्सनाही क्रिकेटने वेड लावलेले दिसते. म्हणूनच अनेक सिनेतारका क्रिकेटपटुंच्या प्रेमात पडल्या व काहींनी त्यांच्याशी विवाहही केला. उपरोक्त विश्लेषणातून क्रिकेट, बॉलीवूड, उद्योग जगत आणि राजकारण यांच्यात अविभाज्य संबंध आहेत हे लक्षात येते. म्हणूनच भारतीय क्रिकेट, बॉलिवूड आणि राजकारण यांच्यात 'चोली दामन का रिश्ता' आहे असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरू नये.

*****